दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक २८४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.७ जानेवारी २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

राज्यात कोरोनाचा धोका कायम; बाधितांचा आकडा पुन्हा वाढला!

दै.रायगड नगरी । मुंबई

राज्यात आज ६६ करोना बाधित रुग्णांच्या मृत्यूंची नोंद झाली असून दिवसभरात ४ हजार ३८२ नवीन रुग्णांचे निदान झाले आहे तर २ हजार ५७० रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. करोनातून बरे झालेल्या रुग्णांच्या तुलनेत आज नवीन बाधितांचा आकडा जास्त असल्याने चिंतेत काहीशी भर पडली आहे. दरम्यान, राज्यातील रिकव्हरी रेट सध्या ४५ टक्क्यांच्या उंबरठ्यावर आहे तर मृत्यूदर २.५५ टक्के इतका आहे. राज्यात नवीन करोनाचे आठ रुग्ण आढळले आहेत. त्यातील तीन रुग्ण अन्य राज्यांतील असल्याचे स्पष्ट झाल्याने व हे आठही रुग्ण लक्षणे विरहित असल्याने तूर्त मोठा धोका नसला तरी आधीचा करोना संसर्ग अजूनही डोकेदुखी ठरत आहे. राज्यात आज करोनाने आणखी ६६ रुग्णांचा मृत्यू झाला असून आतापर्यंत या आजाराने ४९ हजार ८२५ जणांचा बळी घेतला आहे. आज राज्यात ४ हजार ३८२ नवीन रुग्णांचे निदान झाले आहे तर २ हजार ५७० रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत.

फ्लॅटची 'स्टॅम्प ड्युटी' आता बिल्डरलाच भरावी लागणार

दै.रायगड नगरी । मुंबई

घर खरेदी करताना ग्राहकांना भरावे लागणारे मुद्रांक शुल्क (स्टॅम्प ड्युटी) आता विकासकांना भरावे लागणार आहे. या संबंधिचा महत्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

दिवसेंदिवस घराच्या किंमती वाढतच चालल्या आहेत. त्यामुळं सामान्य लोकांना घर घेणंही परवडत नाही. घर विकत घेण्यासाठी त्यांना त्यांच्या आयुष्यभराची सर्व कमाई खर्च करावी लागते. पण आता अशा ग्राहकांना दिलासा देणारा एक महत्त्वाचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. त्यामुळं काही प्रमाणात का होईना पण सामान्य ग्राहकांच्या खिशावरील भार कमी होणार आहे. यापूर्वी घर खरेदी करताना ग्राहकाला मुद्रांक शुल्क भरावा लागत होता. पण येथून पुढे त्यांना मुद्रांक शुल्क भरावा लागणार नाही. राज्यसरकारच्या या नवीन निर्णयान्वये, येथून पुढे मुद्रांक शुल्क बांधकाम व्यावसायिकांना भरावं लागणार आहे. मुद्रांक शुल्क भरण्याची सक्ती बांधकाम व्यवसायिकांना केली आहे. हा संबंधित महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

त्याचबरोबर राज्यातील बांधकामांवर प्रीमियम सवलतींचा लाभ देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. याबाबतची माहिती राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी दिली आहे.

यापूर्वी घराची नोंदणी करताना मुद्रांक शुल्क ग्राहकांना भरावा लागत होता. त्यामुळे त्यांच्या जास्तीचे पैसे मोजावे लागत होते. परिणामी त्याचं आर्थिक बजेट ढासळत होतं. कोरोना लॉकडाऊनमुळे बांधकाम व्यवसाय पूर्णपणे ठप्प होता. त्यामुळं या क्षेत्राला पुनर्जीवित करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. या निर्णयामुळे घरांच्या मागणीत वाढ होवून परिणामी राज्याच्या तिजोरीत महसूलही गोळा होईल. मुद्रांक शुल्कासोबतच आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत इतरही काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये केंद्र सरकारच्या ग्रामीण रस्ते विकास मंत्रालयासोबतच्या सामंजस्य करारालाही मान्यता देण्यात आली आहे. या करारामुळे राज्यातील ग्रामीण भागातील रस्ते दर्जेदार होण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर राज्यातील शेतकऱ्यांना कृषी पंप वीज जोडण्यांसाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासंबंधिचा निर्णयही आजच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

संक्षिप्त...

ठाण्यातील घटनेने उडाली आरोग्य यंत्रणेची झोप!

दै.रायगड नगरी । ठाणे

देशातील राजस्थान, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश, केरळ या राज्यांत बर्ड फ्यू साथ वेगाने पसरत असतानाच ठाण्यातील वाघबीळ परिसरात १५ पाणबगळे मृतावस्थेत आढळल्याने काहीसे चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पाणबगळ्यांचा मृत्यू नेमका कोणत्या कारणाने झाला, याचा शोध घेतला जात आहे. आरोग्य यंत्रणेकडून या संपूर्ण प्रकारावर बारीक लक्ष ठेवण्यात येत आहे.

ठाण्यातील घोडबंदर रोडवरील वाघबीळ परिसरातील विजय नगर, वाटिक इमारत येथून आज दुपारी साडेतीन वाजता पक्षांच्या मृत्यूची तक्रार आली होती. ही तक्रार प्राप्त होताच ठाणे महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. तेव्हा घटनास्थळी १५ पाणबगळा जातीचे पक्षी मृत अवस्थेत आढळून आले. या पक्षांना पशुवैधकीय विभागामार्फत पशुसंवर्धन रुग्णालय, मुंबई येथे तपासणीसाठी पाठवण्यात आले आहे.

सदर पाणबगळ्यांच्या मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून त्याबाबत सविस्तर अहवाल पशुसंवर्धन रुग्णालय, मुंबई यांच्याकडून प्राप्त होईल असे पशुवैधकीय विभागातून कळवण्यात आले आहे. परंतु, सध्या केरळ व अन्य राज्यांत बर्ड फ्लूचे संकट घोंगावत असताना ठाण्यात पक्षांच्या मृत्यूच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये संभ्रम आणि गोंधळ निर्माण झाला आहे. याबाबत घाबरून जाण्याचे कारण नाही, असे आवाहन करण्यात आले आहे.

जेएनपीटीचा रस्ता खचला ; कोट्यावधी रूपये खर्च करून बांधण्यात येत असलेल्या कामांच्या दर्जा बाबत शंका

दै.रायगड नगरी । जेएनपीटी

कोट्यावधी रूपये खर्च करून बांधण्यात येत असलेला जेएनपीटीचा रस्ता मोठ्या प्रमाणात खचल्याने या रस्त्याच्या कामाबद्दल शंका उपस्थित करण्यात येत आहे. निकृष्ट दर्जाच्या कामामुळेच हा रस्ता खचला असल्याचे जाणकारांचे मत आहे. मंगळवार दि ५ रात्री ९ वाजण्याच्या सुमारास हा रस्ता खचला त्यामुळे जेएनपीटीकडे जाणारी वाहतूक प्रभावित झाली असून ही वाहतूक दुसऱ्या (सर्व्हिस) मार्गाने वळविण्यात आली आहे.

जेएनपीटीचे बहुचर्चित बंदर नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. कोट्यावधी रुपये खर्च करून या चौथ्या बंदरासाठी रस्ते बांधण्यात आले आहेत. मात्र निकृष्ट कामांमुळे हे रस्ते वारंवार खचत आहेत. जेएनपीटी बंदराचा विस्तार वाढत असल्याने जेएनपीटीकडे येणारे सर्व रस्त्यांचे रूंदीकरण, मजबुतीकरण आणि कॉंक्रीटीकरण सूरू आहे. जेनपीटीने जवळ जवळ ३ हजार कोटी रूपये यासाठी खर्च करण्यात येणार आहेत. एनएचएआयच्या निगराणीखाली ही सर्व कामे सूरू आहेत. यामध्ये अनेक उड्डाणपुल आणि छोटे-मोठे पुल आहेत. जेएनपीटी पळस्पे मार्गावर (एनएच-३४८) पागोटे जंक्शनजवळ हा रस्ता खचला. चांगली पायलिंग न करता केवळ खाडीच्या दलदलीत या रस्त्याचा भराव केल्यामुळे हा रस्ता मधोमध खचला त्यामुळे या रस्त्याच्या बाजूने जाणारा सर्व्हीस रस्त्याला देखिल १ ते दिड किलोमिटर पर्यंत भेगा गेल्या असून या रस्त्याच्या बाजूलाच असलेली खारफुटी व चिखल देखिल दाबामुळे वरती आला आहे.

रात्री ९ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली तरी देखिल धोकादायक सर्व्हीस रोडवरून बिनधोकपणे वाहतूक सूरू होती. उशिरा याबाबत वाहतूक पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी या रस्त्यांवरील वाहतूक बंद करून दुसऱ्या मार्गावरून वळविण्यात आली. हा रस्ता खचल्यामुळे येथे सूरू असलेल्या उड्डाण पुलाला ..../२

नापास करण्याची धमकी देत २०१६ पासून शिक्षकच करीत होता विद्यार्थीनीवर अत्याचार

दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव

शिक्षकी पेशाला व माणुसकीला काळीमा फासणारे घृणास्पद गैरकृत्य केलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकाने सन २०१६ ते ५ जानेवारी २०२१ पर्यंत अत्याचार केल्याची तक्रार एका पिडित मुलीने दिनांक ५ जानेवारी रोजी दिल्याने गुन्हा रजि. क्रमांक ३/२०२१ भा. द. वि. सं. क. ३७६ (२)(एन), ५००, ५०६ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ३, ४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६(सी) अन्वये माणगांव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहीती पोलीस सुत्रांकडुन मिळाली आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे कि माणगांव तालुक्यातील मदन वानखेडे या आरोपीत शिक्षकाने पिडीतेची आई ही शिक्षिका असल्याने तिची नोकरी घालवितो व पिडितेला नापास करण्याची धमकी देत शाळेतील विद्यार्थीनी बरोबरच शरिर संबध ठेवले तसेच पिडीत मुली सोबत काढलेले फोटो दाखवुन ते प्रसारीत करण्याची धमकी देऊन वारंवार पिडीतेच्या इच्छे विरुध्द वेगवेगळ्या ठिकाणी अत्याचार करीत शरिर संबध ठेवले. आणि पिडितेच्या मित्रमैत्रीणीना मेसेज पाठवून तिची बदनामी केली. तसेच इंन्स्टाग्रामवर पिडितेच्या नावाचे बनावट अकाउंट तयार करुन पिडितेच्या मित्र मैत्रिणींना बदनामीकारक मेसेज पाठविले. आरोपीत शिक्षक हा पिडितेच्याच बिल्डिंगमध्ये राहत होता.

या गुन्ह्याचे तपासा दरम्यान आरोपी शिक्षक मदन प्रल्हाद वानखेडे रा. दत्तनगर माणगांव याचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास ५ जानेवारी २०२१ रोजी २३.३० वाजता अटक करण्यात आली असुन त्यास दिनांक ११ जानेवारी २०२१ ..../२

पेण येथील आदिवासी कुटुंबातील अत्याचारग्रस्त बालिकेच्या कुटुंबाला

सामाजिक न्याय विभागाकडून रु.४ लाख १२ हजार ५०० ची आर्थिक मदत

दै.रायगड नगरी । अलिबाग

पेण येथे दि. ३० डिसेंबर २०२० रोजी आदिवासी समाजातील तीन वर्षीय बालिकेला घरातून उचलून नेऊन तिच्यावर पाशवी अत्याचार करुन तिची हत्या करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी, रायगड तथा अध्यक्ष जिल्हा दक्षता संनियंत्रण समिती, रायगड आणि सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रायगड यांनी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ सुधारित अधिनियम,२०१५ व सुधारित नियम,२०१६ अंतर्गत तातडीच्या मदतीस मंजूरी दिली. यानुषंगाने अत्याचारग्रस्त बालिकेच्या कुटुंबातील वारस म्हणून वडील जयराम पांडुरंग वाघमारे आणि आई सौ. निकिता वाघमारे यांना रु.४ लाख १२ हजार ५०० रुपयांचा धनादेश आणि एक महिना पुरेल इतक्या अन्नधान्याचे किट काल सायंकाळी (दि. ५ जानेवारी) सुपूर्द करण्यात आले. ..../२

आद्य पत्रकार, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर, मुंबई-गोवा महामार्ग, रायगड प्रेस क्लबने केले महामार्गाचे नामकरण

दै.रायगड नगरी । अलिबाग

कोकणातील पत्रकारांच्या आंदोलनातून मार्गी लागलेल्या मुंबई गोवा महामार्गचे आद्य पत्रकार, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर, मुंबई - गोवा महामार्ग, असे नामकरण रायगड प्रेस क्लबने करीत संपूर्ण जिल्ह्याभरात ठिकठिकाणी महामार्गावर फलक लावले आहेत. या अनोख्या आंदोलनाची सुरुवात पळस्पे येथे फलकाचे अनावरण करून करण्यात आली. मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती दिनी अर्थात पत्रकार दिनी हे अभिनव आंदोलन करण्यात आले. यावेळी रायगड प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष तथा विश्वस्त अभय आपटे, मिलिंद अष्टीवकर, विजय पवार, विजय मोकल, ज्येष्ठ पत्रकार विजय कडू, भाई ओव्हाळ, बी एस कुलकर्णी, वामन पाटील, पद्माकर उभारे, दत्ता शिंदे, राजन वेलकर, विद्यमान अध्यक्ष अनिल भोळे, कार्याध्यक्ष भारत रांजणकर, सरचिटणीस शशिकांत मोरे, उपाध्यक्ष राजेंद्र जाधव, सचिव मोहन जाधव, खालापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, पेण प्रेस क्लबचे अध्यक्ष देवा पेरवी, माणगाव प्रेस क्लबचे अध्यक्ष गौतम जाधव, प्रसिद्धिप्रमुख मुकुंद बेंबडे, नागेश कदम, भालचंद्र जुमलेदार आदींसह जिल्ह्यातून मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते.

मुंबई - गोवा महामार्ग मृत्यूचा सापळा बनला होता. एकट्या रायगड जिल्ह्याच्या हद्दीत दिवसाला दीड जणांचा मृत्यू होत होता. चार जण कायम जायबंदी व्हायचे. ही स्थिती चिंता वाटावी अशी होती मात्र सरकारचं लक्ष नव्हतं आणि कोणत्याही राजकीय पक्षांना काही देणं घेणं नव्हतं. संवेदनशील मनाचे पत्रकार बथ्थड मनानं मृत्यूचं वार्तांकन करू शकत नव्हते.! मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त ज्येष्ठ पत्रकार एस एम देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कोकणातील ..../२

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे कोविड योगदान महाराष्ट्र कधीच विसरणार नाही : ना.आदिती तटकरे

दै.रायगड नगरी । अलिबाग

या शासनाने विविध खात्यांना आर्थिक बळ देत महत्वाचे प्रकल्प हाती घेण्याचा निर्धार केला होता. त्याच काळात अधिवेशन सुरू होते. नव्या सरकारने सर्वसामान्यांना दिलासा देणारे काही निर्णय घोषित करून काम हाती घेतले असतानाच करोनाचे संकट उभे राहिले. या परिस्थितीत जागतिक स्तरावर अचानक उद्भवलेल्या कोविडचा सामना करीत राज्यात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अत्यंत कुशलतेने प्रशासनाच्या सहकार्याने परिस्थिती हाताळून आटोक्यात आणली. त्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे कोविड योगदान अवघा महाराष्ट्र कधीही विसरणार नाही, असे प्रतिपादन राज्याच्या उद्योग, खनिजकर्म, पर्यटन, राजशिष्टाचार राज्यमंत्री तथा पालकमंत्री आदिती तटकरे यांनी काल (दि.५ जानेवारी) येथे केले.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते २०० कोविड योद्ध्यांचा कोविड संजीवनी पुरस्कार प्रदान सोहळा व या निमित्ताने महिलांसाठी विशेष हळदी-कुंकू समारंभाचे आयोजन पनवेल संघर्ष समिती यांच्या पुढाकारातून पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक सभागृहात करण्यात आले होते, त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी आमदार बाळाराम पाटील, महापालिका आयुक्त सुधाकर देशमुख, ज्येष्ठ आयुर्वेदाचार्य डॉ. भक्तीकुमार दवे, प्रशांत पाटील, सुदाम पाटील, डॉ. नागनाथ यमपल्ले, डॉ.स्वाती नाईक, महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, तहसिलदार विजय तळेकर, डॉ. बसवराज लोहारे, संस्थेचे ..../२

पडघे गावातील रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाचे भूमिपूजन संपन्न

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल महानगरपालिका मार्फत पडघे गावात विकास कामे सुरू झाले आहे प्रभाग समिती 'अ' मधील प्रभाग क्रमांक दोन येथे रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्यात येणार आहे याचा शुभारंभ कोकण शिक्षक मतदार संघाचे आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

पनवेल महानगरपालिका मार्फत पडघे येथील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्यात येणार आहे. यासाठी प्रभाग क्रमांक दोनचे शेतकरी कामगार पक्षाचे नगरसेवक विष्णू जोशी यांनी पनवेल महानगरपालिकेकडे पाठपुरावा करून या रस्त्याच्या कामासाठी पनवेल महानगरपालिकेकडून तीन कोटी सात लाख बत्तीस हजार रुपयांचा निधी उपलब्ध केला. सदर त्या रस्त्याचे काम तलोजा एमआयडीसी कमानी पासून ते पडघे गावातील हनुमान मंदिरापर्यंत करता येणार आहे.

या रस्त्याच्या भूमिपूजनासाठी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, शेतकरी कामगार पक्षाचे नगरसेवक अरविंद म्हात्रे, नगरसेविका उज्वला पाटील, नगरसेविका अरुणा दाभणे, कामगार नेते प्रकाश शेठ म्हात्रे, बाबू शेठ भोईर, माजी सरपंच अनंता भोईर, विजय पाटील, बबन विश्वकर्मा, माजी ..../२

गुहेत गायब 'अलीबाबा'

जगाच्या इतिहासात एकाही हुकूमशहाला त्याच्यावर टीका केलेली आवडलेली नाही. मग तो सत्ताधीश डाव्या 'क्रांती'चे अपत्य असो; लष्करी सेनानी असो किंवा निवडणुकांमध्ये विजय मिळवून लोकशाहीच्या मखरात बसणारा अरेराव असो. चीन हा तर साऱ्या जगाला आपली राजकीय व्यवस्था उत्तम असल्याचे सांगणारा देश. तेथील शी जिनपिंगसारखा सत्ताधीश क्रूरकर्मा टीका सहन करेल, ही शक्यता कधीही नव्हती. 'अलीबाबा' या शून्यातून उभारलेल्या बहुअब्ज चिनी कंपनीचे संस्थापक जॅक मा हे दहा ऑक्टोबरनंतर कुणालाही दिसलेले नाहीत. दोन दिवसांपूर्वी जगभर बातम्या आल्यानंतर चिनी कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र असणाऱ्या 'पीपल्स डेली'ने आता एका अज्ञात ठिकाणी जॅक मा निगराणीखाली असल्याचे म्हटले आहे. थोडक्यात, जॅक मा यांना 'मुक्त संवाद' साधल्याची शिक्षा म्हणून डांबून ठेवण्यात आले आहे. खरेतर, चीन हा देशच एक मोठा तुरुंग असल्यावर वेगळ्या तुरुंगांची गरजच नाही. पण सगळे हुकूमशहा हे वरवर शौर्याचा आव आणत असले तरी ते जरा वेगळा सूर कानावर आला की लगेच बिथरतात. 'चीनमधील बँकिंग म्हणजे म्हाताऱ्यांचा क्लब झाला असून त्यांना उद्योगांच्या विकासाशी घेणेदेणे नाही,' अशी टीका जॅक मा यांनी केली होती. हे बाण सरकारच्या दिशेने जाणारे होते. जॅक मा हे आजही चिनी कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य आहेत. चिनी नवक्रांतीचे प्रणेते दिवंगत डेंग यांनी कराल हुकूमशाही आणि उन्मादी भांडवलशाही यांच्या मिश्रणातून जी व्यवस्था जन्माला घातली, तिचे अपत्य म्हणजे जॅक मा. क्रांती आपली पिले खाते; पण कम्युनिस्ट अर्थक्रांतीही आपली पिले आता खाऊ लागलेली दिसते. जॅक मा हा चिनी यशाचा जगातील परवलीचा शब्द होता. ते आता बाहेर येतील का, कधी येतील आणि आले तर त्यांची अवस्था काय असेल, हे काहीही सांगता येत नाही. शी यांच्यावर टीका करणारे रेन शिंगियांग हे असेच गायब झाले. नंतर त्यांना १८ वर्षांचा तुरुंगवास झाल्याची बातमी आली. 'वुहान'चा डॉ. ली हा तरुण डॉक्टर तर मरणच पावला. पण करोना व्यवस्थापनावर टीका करणारी झांग झान ही पत्रकारही दिसेनाशी झाली. अशी असंख्य उदाहरणे आहेत. जॅक मा यांच्याबाबत चीन सरकारची काही बाजू असू शकते. त्यातली एक म्हणजे, या बलाढ्य कंपन्या आपला एकाधिकार निर्माण करून स्पर्धा व स्पर्धकांना संपवतात. पण असे तर अमेरिकेत गूगल व इतर कंपन्याही राजरोस करतात. मात्र, त्यांच्या प्रमुखांना कोणी उचलून गायब करत नाही. जॅक मा यांचे अपहरण हे चिनी हिमनगाचे टोक आहे, हे साऱ्या जगाला माहीत आहे. चीनने हाँगकाँगमध्ये असंख्य लोकांना गायब तर केलेच; पण आज तिथल्या कोणत्याही नागरिकाला कितीही काळ तुरुंगात सडवता येईल, इतके कायदे कडक केले आहेत. शी जिनपिंग हे देशात, बाहेर, सीमेवर सगळीकडे अत्यंत विस्तारवादी व बुलडोझरी भूमिकेतून वागत आहेत. जॅक मा प्रकरणाचे भारतानेही काही धडे घ्यायला हवेत. एकतर भारतीय निर्णयप्रक्रिया अधिक वेगवान व पारदर्शक झाली तर चीनमध्ये जाण्यापेक्षा उद्योजक भारतात येतील. दुसरे म्हणजे, भारत अशावेळी प्रचार यंत्रणेत अगदीच मार खातो. जॅक मा सारख्या चीनमधील अनेक प्रकरणांचा भारताने आक्रमक प्रचार युद्धात जोरदार वापर करायला हवा. तो होत नाही. तिसरा धडा अवघड आहे. व्यवस्थेवर टीका करणाऱ्यांची तोंडे साम-दाम-दंड-भेद वापरून बंद करायची नसतात. जॅक मा प्रकरणातून करोनोत्तर काळातला चिनी सत्ताधाऱ्यांचा आक्रमक व निष्ठुर पवित्रा पुढे येतो आहे. काही तज्ज्ञांच्या मते जॅक मा यांच्या स्थानबद्धतेने चीनचा चेहरा व तिथला कथित मोकळा समाज जगाला समजला. हे खरेच आहे. अर्थसुबत्ता पण स्वातंत्र्यसंकोच असे अतिशय अनैसर्गिक समीकरण चीन गेली अनेक दशके धडाक्याने राबवत आहे. स्वातंत्र्याची आणि मुक्त अभिव्यक्तीची ऊर्मी भौतिक सुखांमध्ये कायमची दडपून राहू शकते का, हा सवाल चीनमध्ये हळूहळू ऐरणीवर येणार आहे. जॅक मा यांची अटक, शेकडो जणांचे गायब होणे, शिनजियांग प्रांतात लाखो मुस्लिमांना 'नवे मूल्यशिक्षण' देण्याचे अघोरी प्रयोग ही सारी त्याचीच लक्षणे आहेत. लोकशाहीची गाणी गाणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांवर बीजिंगच्या थ्येन् आन् मन् चौकात चिनी राज्यकर्त्यांनी चार जून १९८९ रोजी रणगाडे घातले होते. दुर्दैव म्हणजे, जॅक मा यांनी या कारवाईचे अनेकदा समर्थन केले होते. चीन सरकारच्या अंधाऱ्या गुहेत गायब होण्याची वेळ एक दिवस आपल्यावरही येईल, असे जॅक मा यांना तेव्हा वाटलेही नसेल. जॅक मा यांना जो धडा आज मिळतो आहे; त्यातून भारत व जग काय शिकणार हा आता खरा गंभीर प्रश्न आहे. लोकशाही निष्ठेने जपणाऱ्या भारताने या निमित्ताने चीनच्या विरोधात जगभर आक्रमक आघाडी उघडायला हवी.

पनवेलकरांना महापालिकेचा नववर्षाचा दणका, मालमत्ता कराच्या लाखो रुपयाच्या पाठवल्या नोटीसा

दै.रायगड नगरी । कळंबोली

कोणत्याही कराचा बोजा नागरिकांवर पहिल्या काही वर्षांत न टाकण्याचे अभिवचन देणाऱ्या पनवेल महापालिकेने पनवेलमधील गृहनिर्माण हौसिंग सोसायटीना नववर्षाच्या मालमत्ता कराच्या नोटिसा धाडून चांगलाच दणका दिला आहे. सिडकोपेक्षा दसपटीने असणाऱ्या मालमत्ता कराच्या नोटीसिने सोसायटीचे चांगलेच धाबे दणाणले आहेत. नववर्षाच्या या महापालिकेच्या अनोख्या भेटीने नागरिकांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे आमची सिडकोच बरी होती असे नागरिक आता म्हणू लागले आहेत. महापालिकेच्या या मालमत्ता कराला कडाडून विरोध करणार असून वेळप्रसंगी न्यायालयातही या विरोधात लढा देणार असल्याचे येथील ज्येष्ठ समाजसेवक आत्माराम पाटील यांनी सांगितले आहे.

पनवेल महापालिका निर्माण केल्यानंतर पहिल्या काही वर्षात नागरिकांवर कोणत्याही कराचा बोजा टाकणार नसल्याचे महापालिका निर्माण करताना सांगण्यात आले होते. मात्र आता २०२१ च्या पहिल्याच आठवड्यात महापालिकेने गृहनिर्माण संस्थांना मालमत्ता कराच्या लाखो रुपयाच्या नोटिसा पाठवून चांगलाच दणका देऊन नववर्षाची एक खिसा कापणारी भेटच दिली असल्याचे बोलले जात आहे. पूर्वी सिडको सेवाकराच्या रूपाने कर आकारीत होती मात्र या कराची रक्कम ही काही लाखाच्या आत असायची. मात्र यापेक्षा महापालिकेने पाठवलेल्या मालमत्ता कराच्या नोटिसा या शिडको पेक्षा दस पटीने जास्त असल्याने गृहनिर्माण संस्थांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत. सदरचा मालमत्ता कर हा प्रत्येक निवासी सदनिकेचा नावाने पाठवण्यात आलेला आहे. कळंबोली मधील गुरु व्हींल्हा हाउसिंग सोसायटीला यापूर्वी सिडकोचा सेवाकर हा एक लाखाच्या आत मध्ये असायचा त्यामुळे नागरिकांमध्ये विभागून दिल्यानंतर सदनिका धारकांना एक हजार रुपयाच्या आत मधील रक्कम नागरिकांना सिडकोला भरावी लागत असे. मात्र आता सात लाख रुपयाच्या पेक्षा जास्त रुपयाच्या नोटिसा महापालिकेने पाठवल्याने त्याचा कराचा बोजा हा नागरिकांवर आता पडणार आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाच्या विरोधात नागरिकांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत काही हरकती असतील तर त्या २१ दिवसाच्या आत सबळ कागदोपत्री पुराव्यानिशी सादर करून मांडण्यासाठी महापालिकेतर्फे वेळ देण्यात आलेला आहे. महापालिका निर्माण झाल्यानंतर काही वर्ष कोणत्याही कराचा बोजा हा नागरिकांना दिला जाणार नसल्याचे सांगण्यात आले होते मात्र आता महापालिकेने एक प्रकारे येथील नागरिकांची फसवणूकच केल्याचे बोलले जात आहे. सदरचा आकारण्यात आलेल्या मालमत्ता कराचा फेरविचार व्हावा अशी मागणीही आता जोर धरू लागली आहे. त्यामुळे आमची सिडको च बरी होती असे आता कळंबोलीतील नागरिक बोलू लागले आहेत.

> महापालिका एक तर निर्माण करताना खूपच घाई करण्यात आली होती. कोणतीही सेवा सुविधा महापालिकेच्या मालकीचे नसताना घाईगडबडीत पनवेल करांवर महापालिका लादण्यात आली. तसेच पुढील काही वर्षे कोणताही कराचा बोजा टाकणार नसल्याचे वचनही देण्यात आले होते. मग या मालमत्ता कराचा बडगा कळंबोलीराना का, आमची सिडकोच बरी होती, चांगल्या सेवा-सुविधा कमी रकमेत देत होती. या मालमत्ता कराला निश्चितच कडाडून विरोध करणार आहे.
>
> **आत्माराम पाटील**
> **ज्येष्ठ समाजसेवक कळंबोली**
> **पनवेल रायगड**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली गावाच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी सर्वोतोपरी सहकार्य करणार : ना.एकनाथ शिंदे

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली गावाच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी निधी उपलब्द करण्याबरोबरच आवश्यक ते सहकार्य करणार असल्याची ग्वाही नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

रायगड जिल्ह्यातील व सुधागड तालुक्यातील अष्टविनायकाचे प्रख्यात धार्मिक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रुपांतर होण्याची प्रकीया मागील साडेपाच वर्षांपासून लालफितीत अडकली होती. मात्र पाली नगरपंचायत स्थापनेची जलदतेने घोषणा केल्याबद्दल नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांचे शिवसेना पदाधिकाऱ्यांनी नुकतीच भेट घेऊन आभार मानले. यावेळी आमदार महेंद्र दळवी, सभापती नंदू सुतार, राजेंद्र राऊत, विभागप्रमुख किशोर दिघे आदी उपस्थित होते. या भेटीत नगरपंचायत स्थापित झाल्यानंतर होणारी विकासकामे, पाली गावाला मुबलक व शुद्ध पाणीपुरवठा, पालीतील रस्ते व गटारे बांधकाम ह्यासाठी निधी देणे बाबत सविस्तर चर्चा देखील करण्यात आली असल्याची माहिती राजेंद्र राऊत यांनी दिली. पाली ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रुपांतर होण्याचे पालीकरांचे स्वप्न आता साकार होणार आहे. पालिकरांना २०२१ हे नववर्ष नगरपंचायतीची भेट घेऊन आले आहे. या संदर्भातील अधिसूचना महाराष्ट्र नगरविकास विभागाने गुरुवारी (दि.३१) जारी केली आहे. आणि त्यानुसार नगरपंचायत स्थापित होईपर्यंत पाली-सुधागड तहसीलदार दिलीप रायन्नावार प्रशासक म्हणून काम पाहणार आहेत. न्यायालयीन प्रक्रिया, प्रशासकीय व शासकिय अनास्था, राजकीय महात्वाकांशा आणि राजकारन्यांचा हव्यास अशा अनेक अडचणींनी नगरपंचायतीच्या मार्गात आत्तापर्यंत बरेच अडथळे आले आहेत. २०१९ मध्ये न्यायालयाच्या सकारात्मक निकालाने सर्वांना दिलासा मिळाला होता. तसेच मागील महिन्यात ग्रामपंचायतीने देखील नगरपंचायत होण्यासंदर्भात सकारात्मक ठराव पाठविला होता. त्यानंतर नगरपंचायतीची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. आता पालीला नगरपंचायतीचा दर्जा प्राप्त होणार असून पाली गावाची विकासाच्या दृष्टीने वाटचाल सुरू झाली आहे. दरम्यान अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली गावाला तसेच येथे येणारे लाखो भाविक व पर्यटक यांना अधिकाधिक मूलभूत व नागरी पायाभूत सेवा सुविधा उपलब्द करण्याबाबत राज्य सरकारच्या माध्यमातून आवश्यक ते सहकार्य करणार असल्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी आश्वाशीत केले.

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

आदिवासी सेवा संघाची मुरबाड तालुका कार्यकारणी जाहिर

दै.रायगड नगरी । मुरबाड

आदिवासी समाजातील बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी व जनजागृती - प्रबोधन करण्यासाठी पत्रकार गणपत वारगडा यांनी सन २०१३ साली आदिवासी सेवा संघ, महाराष्ट्र राज्य संघटनेची स्थापना केली. सुरुवातीच्या काळात नवी मुंबई व रायगड जिल्हा मोठ्या प्रमाणात समाजासाठी कामं केली. त्याचबरोबर शासन दरबारी भांडून आदिवासी बांधवांना न्याय देण्यासाठी प्रयत्नशील राहिले.

ठाणे जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात आदिवासी समाजाची खुप बिकट परिस्थिती आहे. काही भागामध्ये आदिवासींच्या योजना व सुखसोयी पोहचत नाही. या ठिकाणी रोजगारीचा सुद्धा मोठा प्रश्न असून समाजात जनजागृती व प्रबोधन करण्याची काळाची गरज असल्याने ठाणे जिल्हा सुध्दा आदिवासी सेवा संघ, महाराष्ट्र राज्याची शाखा ही मुरबाड तालुक्यात जाहिर करण्याचे अनेक कार्यकर्त्यांची इच्छा होती. याच उद्देशाने सोमवार (२८ डिसें. २०२०) रोजी मुरबाड तालुक्यातील केळीचीवाडी येथे आदिवासी सेवा संघ, मुरबाड तालुक्याची कार्यकारीणी जाहीर केली.

यावेळी आदिवासी सेवा संघ महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष, पत्रकार गणपत वारगडा, रायगड जिल्हा सचिव गणेश पारधी, कर्जत तालुकाध्यक्ष जैतू पारधी, बबन निरगुडा सर यांच्या प्रमुख उपस्थितीत सामाजिक कार्यकर्ते हनुमान पोकळा यांची मुरबाड तालुका अध्यक्ष पदी सर्वानुमते निवड केली. तर उपाध्यक्ष दिलीप वाघ, सागर भला, महेश वाघ, कार्याध्यक्ष मोहन भला, सचिव विठ्ठल भुरबुडा, खजिनदार राघो वाख, सहसचिव जगदिश निरगुडा, सहखजिनदार पांडूरंग दरवडा तर सदस्य सुरेश हंबीर, पांडूरंग भला, पंकज सावंत, प्रविण भला, सुभाष पारधी, संजय वाघ, प्रविण खाकर, मधुकर धुपारी, महेंद्रा निरगुडा, प्रमोद धुपारी, सोमनाथ वाघ, नंदू उघडा, विलास पादीर, काशिनाथ भला, भरत निरगुडा, रघुनाथ खाकर, सुनिल दरवडा, नाना खाकर, गोविंद सावंत, दत्ता पारधी, जयवंत निरगुडा, भास्कर भला, शाम खाकर, कैलास पोकळा, विनोद वाघ, उमेश सावंत, रुपेश सावंत, योगेश भला, चंदू मेंगाळ, सुकऱ्या वाघ, महेश वाघ, तुषार वाघ, हनुमान खोडका, अनिल खोडका, रविंद्र वाख, प्रभू दरवडा, सोनू पोकळा, तानाजी भला, रविद्र शिंगवा, विश्वनाथ पारधी, रामचंद्र वाघ, मोहन मेंगाळ, मनोज वाघ, नंदू वाघ, शंकर वाघ, हरि मेंगाळ, सुभाष मेंगाळ, आजय कवटे, गणेश भला, कृष्णकांत सोंगाळ, कल्पेश खाकर, दिनेश पोकळा, चंदू उघडा, काळूराम बांगारा, प्रकाश बांगारा, बळीराम खंडवी यांचे आदिवासी सेवा संघ मुरबाड तालुका सदस्य पदावर नियुक्ती करण्यात आली.

पृष्ठ क्र.१ वरुन...

जेएनपीटीचा रस्ता खचला

देखिल धोका निर्माण झाला आहे. या पुलाच्या एप्रोच रस्त्यासाठी हा भराव सूरू होता. जवळ जवळ १०० ते १५० मिटर पर्यंत या भरावाची माती जमिनीत खचली आहे. दोन वर्षापूर्वी देखिल एनएचएआयने बांधलेला सिंगापूर पोर्टचा रस्ता देखिल मोठ्या प्रमाणात खचला होता.

या बाबत एनएचएआयचे प्रकल्प संचालक प्रशांत फेगडे यांच्याकडे विचारणा केली असता त्यानी रस्ता खचण्याची कारणे शोधण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत.मात्र नेमके कशामुळे हे घडले हे आत्ता सांगता येणे शक्य नसल्याचे त्यांनी सांगितले. येत्या १५ दिवसात हा रस्ता आम्ही पुर्ववत करून वाहतूक सुरळीत करू तोपर्यंत पर्यायी मार्गावरून वाहतूक वळविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

शिक्षकच करीत होता विद्यार्थीनीवर अत्याचार

पर्यंत मा. न्यायालयाने पोलीस कोठडी दिली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस अधिक्षक अशोक दुधे व अप्पर पोलीस अधिक्षक सचिन गुंजाळ अलिबाग रायगड तसेच पोलीस उपविभागीय अधिकारी प्रविण पाटील माणगांव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्याचे निरिक्षक प्रदिप देशमुख हे करीत आहेत.

४ लाख १२ हजार ५०० ची आर्थिक मदत

पालकमंत्री कु.आदिती तटकरे व जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण रायगड सुनिल जाधव यांनी ही कार्यवाही तातडीने पूर्ण केली.

अत्याचारग्रस्त बालिकेच्या कुटुंबाला मदतीचा धनादेश देताना सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण रायगड सुनिल जाधव यांच्यासह पेण उपविभागीय अधिकारी विठ्ठल इनामदार, पेण उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती चव्हाण, पेण तहसिलदार श्रीम. अरुणा जाधव, पोलीस निरीक्षक बाळकृष्ण जाधव, समाज कल्याण निरीक्षक अंकुश पोळ उपस्थित होते.

रायगड प्रेस क्लबने केले महामार्गाचे नामकरण

पत्रकारांनी हातातील लेखणीच्या माध्यमातून या विरोधात आवाज उठवत मुंबई गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाची मागणी लावून धरली. मात्र सत्ता दखल घेत नव्हती. तेव्हा एस एम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांनी रस्त्यावर उतरून आंदोलनं करण्याचा निर्णय घेतला. २ ऑक्टोबर २००८ रोजी वडखळ नाक्यावर पहिलं रस्ता रोको आंदोलन केलं. त्यानंतर सलग सहा वर्षे मानवी साखळी, धरणे, उपोषणं, मश्याल मार्च, लाँग मार्च, अशा सनदशीर मार्गांनी आंदोलनं केली. पत्रकार आंदोलनं करीत होती तेव्हा सारेच राजकीय पक्ष गप्पगार होते. मात्र २०१२ च्या अखेरीस महामार्गाच्या रूंदीकरणाचं काम सुरू झालं आणि श्रेय लाटण्यासाठी सारे राजकीय पक्ष धावाधाव करू लागले. आजही ही धडपड थांबलेली नाही. मात्र हे काम कोणामुळे मार्गी लागलं हे कोकणातल्या जनतेला पक्कं माहित होतं. त्यामुळे सामांन्य कोकणी माणूस विभागातील पत्रकारांना धन्यवाद देत असतो.

पत्रकारांनी एखादा सामाजिक प्रश्न हाती घेतला, त्यासाठी पाच सहा वर्षे लढा दिला आणि त्यात यश मिळवायची ही अनोखी घटना आहे. संयुक्त महाराष्ट्रानंतरचा पत्रकारांनी लढलेला हा एकमेव पद्दीर्घ लढा होता. हा मार्ग आता पूर्ण होत आला आहे. पत्रकारांच्या लढयामुळे हा महामार्ग होत असल्याने महामार्गास आद्य पत्रकार, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर याचं नाव द्यावं अशी मागणी सर्वप्रथम कोकणातील पत्रकारांनी केली. तर राजकारण्यांनी त्यालाही फाटे फोडले. अनेकांनी वेगवेगळी नावं पुढं करून नामांतराचा वाद सुरू केला. मात्र पत्रकारांनी दर्पणकारांच्या नावाच्या मागणीचा आग्रह कायम ठेवला. बाळशास्त्रीं हे कोकणातले, सिंधुदुर्गचे सुपूत्र असल्याने त्यांचे नाव या महामार्गाला देऊन साहित्यिक, कलावंत, पत्रकारांचे कार्य देखील कमी लेखत नाही हे सरकारनं दाखवून द्यावे, पत्येक वेळी राजकीय नेत्याचीच नाव द्यावं असं काही नाही.. समाजात अन्य क्षेत्रातील लोकांचं योगदान कमी लेखणयाचं कारण नाही..सरकारनं हे वास्तव स्वीकारत महामार्गाला बाळशास्त्री जांभेकर यांचं नाव द्यावं अशी पुनर्रमागणी एस एम देशमुख यांनी या निमित्ताने केली आहे. अर्थात सरकार काय निर्णय घेईल ते घेऊ द्या.. आम्ही मात्र आद्य पत्रकार, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर, मुंबई गोवा महामार्ग असं या मार्गाचे नाव नक्की केलं असून तसे फलक महामार्गावर पत्रकार दिनी ठिकठिकाणी लावण्यात आले असल्याचेही सांगायला ते विसरले नाहीत.

आजच्या दिवसाचे औचित्य साधून गोरेगांव - लोणेरे प्रेस असोसिएशनने महामार्गावर नवघर आणि लोणेरे नाक्यावर नामकरणाचे फलक लावले. यावेळी अध्यक्ष केदार खुळे, भारत गोरेगावकर आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र कधीच विसरणार नाही : ना.आदिती तटकरे

अध्यक्ष कांतीलाल कडू, ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र साळस्कर, फारूखशेठ, भरत जाधव, श्री.नेटके आदी मान्यवर उपस्थित होते.

त्या पुढे म्हणाल्या की, पनवेलमध्ये करोना काळात पनवेल आरोग्य विभाग, महापालिका प्रशासनासोबत पनवेल संघर्ष समितीचे अध्यक्ष कांतीलाल कडू यांनी अतुलनीय कार्य केले आहे. रुग्णांच्या मदतीच्या अनुषंगाने रात्री-अपरात्री त्यांचा फोन येत असे, कोणत्याही कोविड रूग्णाला काही सहकार्य हवे असल्यास ते सतत माझ्या संपर्कात असायचे,त्यावर तात्काळ पनवेल महानगरपालिका प्रशासनाशी समन्वय साधून पनवेलसाठी उपाययोजना, आरोग्यसुविधा पुरविण्याचे कार्य मार्गी लावले जात होते.

राज्यात नव्यानेच मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी बहुतेक विभांगासाठी पुरेसा निधी मंजूर केला होता. त्यामुळे काम करण्याची नवी उर्जा मिळाली. परंतु, त्याच काळात नेमके करोनाचे संकट उभे राहिले. त्यावर मात करीत राज्य सरकारने महाराष्ट्राची विस्कटणारी घडी व्यवस्थित बसविण्यासाठी भगीरथ प्रयत्न केले, ते राज्याने आणि संपूर्ण देशाने पाहिले. कोविडबाबतीत या शासनाने केलेल्या उपाययोजनांचे, मार्गदर्शक तत्वांचे देशातील इतर काही राज्यांनी अनुकरणही केले, हे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या कार्यशैलीचे यशच मानावे लागेल,असेही पालकमंत्री कु.तटकरे म्हणाल्या.

याप्रसंगी कोविड संजीवनी पुरस्कारप्राप्त योद्ध्यांच्या यथोचित गौरवार्थ आमदार बाळाराम पाटील, महापालिका आयुक्त सुधाकर देशमुख,ज्येष्ठ आयुर्वेदाचार्य डॉ. भक्तीकुमार दवे, डॉ.नागनाथ येमपल्ले, डॉ.स्वाती नाईक, प्रशांत पाटील, सुदाम पाटील, संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल कडू यांनीही आपली मनोगते व्यक्त केली.

उपस्थित मान्यवरांचे भास्करराव चव्हाण, मल्लीनाथ गायकवाड, भास्कर भोईर, आशा चिमणकर, शैला म्हात्रे, राजेश्वरी बांदेकर, शुभांगी लखपती, संतोष शुक्ला, मम्मी नायक, प्रमिला पाटील, सीमा नायक, रमेश गोवारी, योगेश पगडे, सुनील भोईर, सचिन पाटील, हर्षल पाटील, किरण करावकर, महेंद्र पाटील, मंगल भारवाड, विजय कलोते, भूषण साळुखे, दर्शन ठोंबरे, स्वप्निल म्हात्रे यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन तुळशीदास राठोड यांनी तर आभार अभिजित पुळेकर यांनी मानले.

रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाचे भूमिपूजन संपन्न

उपसरपंच वसंत शेठ भोईर, माया जोशी, गणपत जोशी, माजी सरपंच जनार्दन भोईर, गुरुनाथ जोशी, हिरा शेठ भोईर, शंकर जोशी, जगदीश जोशी, किशोर जोशी, माया पाटील, दादू कांबळे, बबन भोईर, सचिन पाटील, भगवान म्हात्रे, विनय जोशी, निलेश भोईर, आदी ग्रामस्थ व कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

राज्यात बर्ड फ्लू रोगाचा संसर्ग नाही पशुसंवर्धन विभागाची माहिती

दै.रायगड नगरी । अलिबाग

राज्यात वन्य, स्थलांतरीत पक्षी अथवा कोंबड्यांमध्ये बर्ड फ्लू रोगाचा संसर्ग आढळून आलेला नाही. त्यामुळे कुक्कुटपालक तसेच अंडी आणि मांस खाणाऱ्या नागरिकांनी घाबरण्याची परिस्थिती नाही. परंतु व्यावसायिक स्तरावर कुक्कुट पालनाच्या ठिकाणी काही बाब आढळून आल्यास त्वरीत पशुवैद्यकीय रुग्णालयात संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाकडून करण्यात आले आहे. बर्ड फ्लू रोगाचा प्रादूर्भाव हिमाचल प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश आणि केरळ या राज्यांमधील स्थलांतरीत पक्षांमध्ये आढळून आला आहे. हिमाचल प्रदेशामध्ये कांगडा जिल्ह्यातील पाँग धरणाच्या परिसरात सायबेरिया आणि मंगोलिया देशांमधून स्थलांतरीत झालेल्या बदकांमध्ये हा प्रादूर्भाव आढळून आला आहे. निशाद (नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ हायसिक्युरिटी निमल डिसीजेस, भोपाळ) या राष्ट्रीय संस्थेने बर्ड फ्लु रोगाचा एच५एन१ स्ट्रेन कारणीभूत असल्याचे निदान केले आहे. हिमाचल प्रदेशातील वन विभागांद्वारे पानथळ जमिनीशेजारच्या भागामध्ये या रोगाच्या सर्वेक्षणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. राजस्थान राज्यातील झालवाड आणि जोधपूर आणि मध्यप्रदेशातील इंदौर जिल्ह्यातील कावळ्यांमध्ये हा प्रादूर्भाव झाला आहे.

आमच्या मरण यातना कधी संपणार, कोळवट पंचक्रोशीतील नागरिकांची खासदारांना विनवणी

दळणवळण करण्यासाठी नागरिकांना करावी लागते पायपीट ; नागरिकांचे दुर्लक्ष

दै.रायगड नगरी । म्हसळा

म्हसळा तालुक्यातील डोंगराळ दुर्गम भागात वसलेली सहा गावे ताम्हणे करंबेवाडी, ताम्हणे करंबे, रातीवणे, कोळवट, भापट, या गावांचा समावेश आहे. त्या गावाला दळणवळण करण्यासाठी प्रवासाचा साधन म्हणजे कोळवट रस्ता तो रस्ता गेली १५ वर्ष नादुरुस्त आहे. अनेक वेळा त्या गावातील ग्रामस्थांची विविध पक्ष, आमदार, खासदार, मंत्री यांना रस्ता करण्यासाठी लेखी निवेदन देऊन रस्त्यासाठी मागणी केली. वारंवार प्रस्ताव देऊनही कोणीही या रस्त्याकडे गांभीर्याने घेत नसल्याने पंचक्रोशीतील ग्रामस्थ हवालदिल झाल्याचे दिसत आहे.

प्रस्तावांचा ढीग पडला असून आजही हा रस्ता दुर्लक्षित आहे. त्यासाठी कोळवट गाव अंतर्गत सहा गावांनी मुंबई ठिकाणी व ग्रामीण ठिकाणी पंचक्रोशी कमिटी स्थापन केली होती. रखडलेला रस्ता पूर्ण करण्यासाठी तात्कालीन सरकार भारतीय जनता पार्टी, शिवसेना, तात्कालीन विरोधी पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आय, मनसे,अन्य पक्षातून या रस्त्याचे काम व्हावे यासाठी प्रयत्न सुरु होते. परंतु सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. हा रस्ता गेली कित्येक वर्ष

दगड मातीचा आहे. परंतु पंचक्रोशीतील ग्रामस्थ दरवर्षी अंगमेहनत करून रस्त्यावर माती टाकून तात्पुरती अडचण दूर करतात,परंतु हे आणखीन किती वर्षे चालायचे अशी प्रतिक्रियाही ग्रामस्थ ऐकून दाखवितात. आजपर्यंत अनेक निवडणुका येऊन गेल्या त्या संबधित पक्षाने शाब्दिक लेखी आश्वासन दिले परंतु कोणीही शब्द, आश्वासन आजही पाळला नाही. त्यामुळे आजही त्या रस्त्याची परिस्थिती बिकट झाली आहे. तालुक्याच्या ठिकाणी प्रवास करायचा म्हणजे तारेवरची कसरत करावी लागते. वास्तविक पाहता भेकऱ्याचा कोंड, ताम्हाणे करंबे, भापट, कोकबल वाडी, रातीवणे आणि कोळवट ही गावे तालुक्यातील अत्यंत दुर्गम आणि डोंगराळ असून या गावातील नागरिकांचे सर्व व्यवहार हे केवळ म्हसळ्यावरच अवलंबून असून, शिक्षण,काम–धंदा या साठी नागरिकांना म्हसळ्या शिवाय दुसरा पर्याय असून हा रस्ता प्रामुख्याने होणे गरजेचे आहे. पावसाळी महामंडळाची एस.टी बसेस प्रवास करते ती देखील समुद्राच्या तरंगणाऱ्या लाटा सारखी करते. काही वेळा महामंडळाची बस देखील बंद केली जाते. त्यावेळी खाजगी वाहनाने प्रवास करायला गेल्यास वाहन वाहनचालक प्रत्येक वेळी नाकारतात.कारण रस्ता अतिशय बेचिराख आहे. त्यासाठी खाजगी वाहन चालक दाम दुपटीने भाडे घेतात आणि सर्वसामान्य मोलमजुरी कारण्यार्याच्या ते आवाक्याबाहेरचे असते. अशा साऱ्या परिस्थितीमुळे या रस्त्याची बिकट अवस्था झाल्याने दिवसेंदिवस आज हा रस्ता जणू डोंगरातून गावात जाणारी पायवाट असल्याचे स्वरूप प्राप्त झाला आहे. त्यामुळे कोळवट रस्ता हा पूर्ण करण्यासाठी बरेच वर्षांनंतर हक्काचा मंत्री आणि स्थानिक पालकमंत्री महोदय पूर्ण करतील काय? अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

यासाठी रायगड चे खास.सुनील तटकरे, पालक मंत्री आदिती ताई तटकरे, आम.अनिकेत तटकरे यांनी जातीने लक्ष घालून आमच्या गंभीर प्रश्नाकडे लवकरात लवकर लक्ष घालून हा प्रश्न सोडविण्याची विनंती कोळवट पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी केली आहे.

> आम्ही सर्व ग्रामस्थ गेली अनेक वर्ष रस्त्याला कंटाळलो असून जीवन जगणे केवळ रस्त्यामुळे दिवसेंदिवस कठिण झाले आहे. कारण निवडणुका आल्या ह्याच रस्त्याने राजकीय पक्ष आश्वासन देण्यासाठी धावत येत असतात. परंतु बाकी इतर दिवस वगळता ह्या रस्त्यावरती कुठला राजकीय नेता फिरकून देखील बघत नाही. त्यामुळे आम्ही प्रत्येक पक्षाला प्रस्ताव सादर केला आहे.
>
> **स्थानिक ग्रामस्थ**

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

मे.पांडे सो. यांचे कोर्टात

अर्जदारांतर्फे वकील
ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.७७९/२०२०
नि.नं.७
ने.ता.०८/०२/२०२१

श्री.तौसीफ खान — अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामसेवक सो वहाळ ग्रुप ग्रामपंचायत,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री.तौसीफ खान यांनी त्यांची मुलगी कु.आयरा खान याचा जन्म दि.१७/०६/२०१८ रोजी मेडी लाईफ हॉस्पिटल, सेक्टर २०, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झालेला आहे. तथापि सदर अर्जदार यांनी त्यांची मुलगी कु.आयरा खान ही दि.१७/०६/२०१८ रोजी मौजे : वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झाल्याबाबत नोंद होवून मिळणेकरिता मे.न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. तथापि सदर अर्जास कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा या कोर्टात प्रत्यक्ष वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये व मुदतीत हरकती न आल्यास मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कायदेशीर कारवाई करेल व ते अर्जदार यांची मुलगी कु. आयरा खान यांचे जन्मासंबंधी योग्य ते आदेश मंजूर करेल. आज दि.०६/०१/२०२० रोजी व माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लपीक
फौ.न्याया, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
प्र.न्याय सो.पनवेल

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक १) श्री.अनिल कृष्णा मुंबईकर, २) श्री.स्वप्नील अनिल मुंबईकर, दोघेही रा.मु.पो.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

मिळकतीचे वर्णन
मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.)	आकार रु.पै.
८१	४	३–५३–३० पो.ख. ०–५४–७० एकूण ४–०८–००	७.६७

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

पनवेल
दिनांक : ०६/०१/२०२१

सही/–
निलेश द. हातमोडे
ॲडव्होकेट
शॉप नं.१३०, मुन्सिपल शॉपिंग कॉम्प्लेक्स,
पहिला मजला, भाजी मार्केट जवळ, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६
मो.नं.८१०८५५८२८९

पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीचा अभिनव उपक्रम...

आदिवासी बांधवांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीच्यावतीने पत्रकार दिनाचे औचित्य साधून दर्पणकार दिवंगत बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीपित्यर्थ गरजू आदिवासी बांधवांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. पनवेल तालुक्यातील खैरवाडी ग्रामपंचायत हद्दीतील फणसवाडी या आदिवासी पाड्यावर पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीचे अध्यक्ष रत्नाकर पाटील, जेष्ठ सल्लागार प्रमोद वालेकर, माधवराव पाटील यांच्या हस्ते वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष केवल महाडिक, कार्याध्यक्ष संजय कदम, सचिव रविंद्र गायकवाड, खजिनदार हरेश साठे, सहसचिव सुधीर पाटील, कायदेशीर सल्लागार अड. मनोहर सचदेव, जेष्ठ पत्रकार विवेक पाटील, विशाल सावंत, ओमकार महाडिक, ऋषिकेश थळे, समाजसेवक रविंद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना अध्यक्ष रत्नाकर पाटील म्हणाले की, फणसवाडी आदिवासीवाडीवर जीवनावश्यक वस्तू वाटप करण्यामागे एक कारण असे होते, ते म्हणजे, ज्या आदिवासीवाडीला जाण्यासाठी रस्ता नाही, अशा अतीदुर्गम आदिवासीवाडीवर आजवर कोणत्याही प्रकारची मदत मिळाली नाही, त्यामुळे मदतीपासून वंचित असलेल्या आदिवासी बांधवांना दिवंगत बाळशास्त्री जांभेकर याची आठवण म्हणून आजच्या उपक्रमाचा खटाटोप असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कोरोना काळात या आदिवासी पाड्यावर कोणत्याही माध्यमातून मदतीचा हात पोहचला नसल्याचे आमच्या निदर्शनास आल्याने आजचा आगळावेगळा कार्यक्रम करण्याचा प्रयत्न केला असल्याचे ही त्यांनी आवर्जून सांगितले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपाध्यक्ष केवळ महाडिक यांनी केले.

सारडे -वशेणी वर्षभरात सव्वीस अपघात ; आठ जणांचा मृत्यू

दै.रायगड नगरी । जेएनपीटी

कोप्रोली खारपाडा मार्गावरील सारडे– वशेणी दरम्यान वळणावर अपघातांची मालिका सुरूच राहिली आहे वर्ष भरात पंचवीस ते सव्वीस अपघात होऊन जवळजवळ आठ जणांचा मृत्यू झाला आहे.

काल ही एका मोटारसायकल वरून जाणाऱ्या दोघांचा अप–घात झाला आहे त्यांना डोक्याला हाताला दुखापत झाली आहे. मात्र ते सुदैवाने बचावले आहेत.त्यामुळे या ठिकाणी वळणावर गतिरोधक बसविण्यात यावे अशी मागणी सारडे ग्रामपंचायत सदस्य समीर म्हात्रे यांनी केली आहे.

कोप्रोली कडून खारपाडा कडे हा मार्ग जाणारा मार्ग सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत आहे.अनेक भागात ठिकठिकाणी वळणे आहे. या मार्गावर अवजड वाहनांची वर्दळ नाही परन्तु मार्ग सुसाट असल्याने वाहने ही भरधाव वेगाने पळविली जातात सारडे वशेणी दरम्यान पुलाच्या पुढे च अपघात का होतात हा येथील लोकांना प्रश्न निर्माण झाला आहे. मात्र अनेक वेळा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे येथे गतिरोधक बसविण्याची मागणी केली. परंतु मागणीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे किती जणांचा अपघातात दुखापत, बळी गेल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग गतिरोधक बसविणार आहे असा प्रश्न येथे उपस्थित होत आहे.

पनवेल मध्ये विविध उपक्रमांनी ममतादिन साजरा

दै.रायगड नगरी । पनवेल

शिवसैनिकांच्या लाडक्या माँसाहेबांचा ६ जानेवारी हा जयंती दिवस, त्यांची आज ९० वी जयंती म्हणजेच ममतादिन हा पनवेल शिवसेना शहर शाखेत विविध उपक्रम राबवून ममतादिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी स्वर्गीय माँसाहेब मीनाताई ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून माँ साहेब अमर रहे अशाप्रकारे घोषणा देण्यात आल्या. तसेच जेष्ठांच्या उपस्थितीत त्यांच्या आठवणींना उजाळा देऊन त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी शिवसेना रायगड जिल्हा सल्लागार रमेश गुडेकर, शिरीष बुटाला, अनिल टेमघरे, शहर प्रमुख अच्युत मनोरे, प्रवीण जाधव, अनिल कुरघोडे, राहुल गोगटे, विश्वास म्हात्रे, सुजन मुसलोंडकर, दत्ता फडके, भास्कर पाटील, स्वप्नील निकम, राकेश टेमघरे, संकेत बुटाला, अमर पटवर्धन, सतीश पाटील, सनी टेमघरे, चेतन शेळके, पराग मोहिते, दत्ता मुंढे तसेच महिला आघाडीच्या कल्पना पाटील, अर्चना कुळकर्णी, उज्वला गावडे, रुही सुर्वे आदी शिवसैनिक व पदाधिकारी उपस्थित होते.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल हे खालील परिशिष्टात वर्णन केलेली शेतजमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मुळ मालक श्री.मंगळ्या मैदया वाक, श्री.शिवराम मैदया वाक, श्रीम.शनिवारी गोमा वाक, श्रीम.मंजुरी सुकऱ्या खैर, श्रीम. सुमन मारुती चौधरी, श्री.जगन गोमा वाक, श्रीम.पार्वती गोमा वाक, श्री.विकास गोमा वाक, श्री.आकाश गोमा वाक, श्री.पद्माकर धर्मा वाक, श्रीम.पुष्पा लालु कानडी, श्री.राजा धर्मा वाक, श्री.सुरेखा जीवन चिडे, श्री.हिरा धर्मा वाक, श्रीम.कुसूम लहू गांगड, श्रीम.वर्षा सुनील बोबडे, श्रीम.अनिता शांताराम खंडवी, श्री.सचिन लहू गांगड, श्रीम.गीता पिंट्या थोराडा, श्री.नितीन लहू गांगडे, श्रीम.इंदु चांगू वाक, श्रीम.हिरा जनार्दन भुरवडा यांच्याकडून ९९ वर्षाच्या कराराने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर शेतजमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

मिळकतीचे वर्णन
मौजे : देहरंग, ता.पनवेल, जि.रायगड

स.नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पैसे
१ ल ३	----	०.६०.०० पैकी ०.१५.०० खरेदी क्षेत्र	२.३९

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक : ०६/०१/२०२१

सही/–
ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे
१४६, पहिला मजला, नगरपालिका
कॉम्प्लेक्स, भाजी मार्केट जवळ, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६
मो.नं.९८९२२२२२५७

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : कुडावे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मुळ मालक/भोगवटाधारक १) वसंत धर्मा ठोंबरे, २) तुळशीराम धर्मा ठोंबरे राहणार : मौजे : कुडावे, ता.पनवेल, जि.रायगड यांचे हिश्याची, मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली खालील वर्णनाच्या जिरायत जमिनी आमचे अशिलांनी त्यांच्याकडून कायम स्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापूर्वी सदर मिळकतीमधील मुळ मालक/भोगवटाधारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरिता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहेत.

मिळकतीचे वर्णन
मौजे : कुडावे, ता.पनवेल, जि.रायगड

अ. क्र.	भूधारणा पद्धती	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी.	आकार रु.पै.
१	१	५६	१	००.२४.३०	०.७५

तरी वर नमूद जमिनीवर/मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क–हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासहीत खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून नमूद मिळकतीबाबतचा जमीन मालक १) वसंत धर्मा ठोंबरे, २) तुळशीराम धर्मा ठोंबरे यांचे मालकी हक्क हे निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत गृहीत धरुन त्याप्रमाणे सदरहू मिळकती आमचे अशिल त्यांचे नावे नोंदणीकृत खरेदीखताद्वारे कायमस्वरुपी त्यांचा वरील जमिनीमधील हिस्सा हस्तांतरीत करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे हे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत. असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०५/०१/२०२१

सही/–
श्री.समाधान आबासाहेब काशिद
वकील उच्च न्यायालय
ऑफिस नं.६, तळमजला, श्री.बालाजी
कृपा सोसायटी, भूखंड क्रं.२८, सेक्टर
नं.२२, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९
मो.नं.९०९६३९९०२०

राव साहेब

ॲड.शुभांगी पाटील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो.पनवेल यांचे न्यायालयात
चौ.अर्ज क्र.६८९/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.२४/०२/२०२१

कै.रामभाऊ हरी कदम
कै.सिताबाई रामभाऊ कदम
(मयत) तर्फे वारस
१) श्री.सचिन रामभाऊ कदम
वय : ३३ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.उमेश रामभाऊ कदम
वय : २८ वर्षे, धंदा : नोकरी
३) सौ.अनिता शशांक गायकवाड
(पुर्वाश्रमीची अनिता रामभाऊ कदम)
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.२/१०, घरकूल, गुडविल
पॅराडाइस समोर, सेक्टर नं.१५,
खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जदार यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जदार यांचे वडील कै.रामभाऊ हरी कदम हे दि.३१/०८/२०१५ रोजी फ्लॅट नं.ए/२, रुम नं.१०, सेक्टर १५, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून येथील कायमचे रहिवासी होते. मृत्यूसमयी त्यांचे नावावर स्वकष्टार्जित खालीलप्रमाणे मिळकत होती व तिचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे : खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड
फ्लॅट नं.ए/२, रुम नं.१०, सेक्टर १५, खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड

मयत कै.रामभाऊ हरी कदम यांचे कायदेशीर वारसदार पुढीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	वारसदाराचे नांव	वय	मयताशी नाते
१	श्री.सचिन रामभाऊ कदम	३३	मुलगा
२	श्री.उमेश रामभाऊ कदम	२८	मुलगा
३	सौ.अनिता शशांक गायकवाड	३१	मुलगी

वरील प्रमाणे मयत कै.रामभाऊ हरी कदम यांचे कायदेशीर वारसदार आहेत व त्यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते. प्रस्तुतचा चौकशी अर्ज हेअरशिप ठरवून मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारसा संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणर नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ५/१/२०२१
ठिकाण : पनवेल

सही/–
क.लपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्याकडून पत्रकार दिनाच्या शुभेच्छा

दै.रायगड नगरी । अलिबाग

मराठी पत्रकारितेचे जनक आद्य पत्रकार, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा व पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या अविस्मरणीय कार्याचा स्मरण करण्याचा आजचा दिवस.

मराठी पत्रकारितेने सशक्त भारतीय लोकशाहीच्या आणि सुदृढ समाजाच्या निर्मितीत आपले महत्वपूर्ण योगदान दिले आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळ असो वा सामान्य माणसाचा आवाज असो, मराठी पत्रकारितेमुळे त्यास बळच मिळाले आहे.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी मराठी पत्रकार दिनानिमित्त आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना विनम्र अभिवादन करताना समस्त पत्रकार बांधवांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

लोकनेते दि बा पाटील यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

दै.रायगड नगरी । उरण

रक्त अभावी रुग्णांची होत असलेली हेळसांड व रक्ताची निकड लक्षात घेऊन शेतकऱ्यांचे, प्रकल्पग्रस्तांचे कैवारी,

लोकनेते स्वर्गीय दि बा पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून आगरी कोळी कराडी संघर्ष सामाजिक संस्थेतर्फे रविवार दि १०/१/२०२१ रोजी सकाळी १० ते दुपारी २ यावेळेत आई रत्नेश्वरी मंदिर जसखार –उरण येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

लोकनेते स्वर्गीय दि.बा.पाटील यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आगरी कोळी कराडी संघर्ष सामाजिक संस्थेने आजपर्यंत अनेक समाजोपयोगी कामे केली आहेत. स्वर्गीय दि.बा.पाटील यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन रविवार दि १०/१/२०२१ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत आई रत्नेश्वरी मंदिर जसखार –उरण येथे आयोजित करण्यात आले असून जास्तीत जास्त रक्तदात्यांनी या रक्तदान शिबिरात आपला सहभाग नोंदवावा. असे आवाहन आगरी कोळी कराडी संघर्ष सामाजिक संस्थेमार्फत करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी इच्छुक रक्तदात्यांनी चेतन गावंड –९८१९७५९१०५, विशाल पाटील –८०७००२१४६३, संग्राम ठाकूर –८४५२९३७३९०, करण नारंगीकर –७७१०९२२७९२ यांच्याशी संपर्क साधावे.

आठगाव कोंढवी भैरवनाथ मंदिराच्या नवीन इमारत खोदकामा दरम्यान आढळल्या पंधरा अश्मयुगीन मुर्ती

दै.रायगड नगरी । पोलादपूर

तालुक्यातील कोंढवीतील फणसकोंड येथून प्रथम गांजवणे, खडपी, चोळई, धामणदिवी, दत्तवाडी, खडकवणे, गोलदरा व तळ्याची वाडी या आठ गांवांचे आराध्य ग्रामदैवत आठगांव कोंढवी भैरवनाथ मंदिराच्या लगत नवीन भव्य पाषाणमंदिर बांधण्याचा संकल्प हाती घेतल्यानंतर याकामी पाण्याची साठवण टाकी खणण्यासाठी खड्ड्यातील माती उपसण्यात आली. मातीच्या ढिगाऱ्यामध्ये १५ अश्मयुगीन पाषाण मुर्ती आढळून आल्याने तालुक्यात या घटनेमुळे भाविकांमध्ये विशेष कुतूहल निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर देवस्थानचे अध्यक्ष एकनाथ गायकवाड यांनी राज्यसरकारने या पवित्र क्षेत्राला तीर्थक्षेत्र वा यात्रास्थळाचा दर्जा द्यावा, अशी मागणी केली आहे.

आदिलशाहीतील सरदार फौलादजंगाच्या यवनी सत्तेत कोंढवीची ग्रामदेवता श्रीजननीआई कुलूपबंद अवस्थेत पूजाअर्चेविना बंदिस्त होती.... हे पाहून चिपळूण येथील भैरवनाथांनी आपल्या या बहिणीच्या मुक्ततेसाठी धाव घेतली... अन् हिंदवी स्वराज्यात छ.शिवाजी महाराजांना बळ देत कोंढवी किल्ल्यावरील यवनी सत्तेला पूर्णपणे पिटाळून लावले... पुढे फौलादजंगाला पोलादपूरच्या श्रीकाळभैरवनाथाच्या छत्रछायेतील समशेर सरदार

या सोनाराने जमीनदोस्त केल्याची आख्यायिका बुजूर्ग ह.भ.प. गंगाराम निकम यांच्याकडून ऐकण्यास मिळते. तर दुसरीकडे कोंढवी किल्ल्याचा इतिहास समर्थ रामदासस्वामी यांच्या रामदास आणि रामदासी प्रकरणातील २९ व्या भागामध्ये 'कोंढवी परगण्याचा करिना' या ऐतिहासिक टिपणेमधील 'टिपण दुसरे' मध्ये कथन करण्यात आला आहे. जीव वाचविण्यासाठी पळणाऱ्या चंद्रराव मोरे यांचा पाडाव करण्यात आल्याच्या या प्रकरणामध्ये यवनी सत्तेचाही उल्लेख आहे. भारतात कोठेही नसलेले वेताळ आणि मारूतीरायाचे एकाच पाषाणातील स्थान केवळ आठगांव कोंढवी भैरवनाथ मंदिरा–लगत पाहण्यास मिळते.

देवस्थानाचे परंपरागत पुजारी अशोक गुरव यांनी, जननीआईच्या मंदिरापासून सुटलेल्या रेड्याने कोंढवीतील फणसकोंड येथून प्रथम गांजवणे, खडपी, चोळई, धामणदिवी, दत्तवाडी, खडकवणे, गोलदरा व तळ्याची वाडी या आठ गांवामध्ये जाऊन मग देऊळमाळावारील उघडा मारूती व वेताळ महाराजाच्या समोरील पायऱ्यावरून प्रस्थान करीत असताना सातव्या पायरीवर रेड्याचा वध करण्यात आला. त्यामुळे रेड्याने वास्तव्य केलेली ही आठ गावे या भैरवनाथांचे क्षेत्र मानले जात आहे. पूर्वी दर तीन वर्षाने हा रेडा जननीआईच्या मंदिरापासून सोडला जाऊन या सातव्या पायरीवर वध करून त्याचे रक्त व मांस यांचे मान दिले जात होते. भातासोबत रक्त कालवून ते देऊळमाळावर पेरण्यासाठी उधळल्यानंतर प्रत्यक्षात ते जमिनीवर पडलेले कधीही कोणास दिसले नसल्याची प्रचिती प्रत्येकवेळी ग्रामस्थांनी घेतली आहे. कालांतराने रेड्याचा दर तीन वर्षांनी वध करण्याची प्रथा बंद झाली असून आता काळ्या रंगाचा एकरंगी बकरा शोधून ही प्रथा पूर्ण केली जात असल्याची माहिती दिली.

देवस्थानचे अध्यक्ष एकनाथ गायकवाड यांनी या जागृत आठगांव भैरवनाथ देवस्थानाची प्रचिती या छत्रछायेतील भाविकांनी नेहमीच घेतली असताना अन्यत्र सर्वदूर पसरलेल्या भाविकांपर्यंत प्रसिध्दी होऊन त्यांना या देऊळमाळावर येण्याची व्यवस्था होण्यासाठी या देवस्थानापर्यंत रस्ता, पाणी, वीज, मंदिराचे सभागृह आणि गाभारा यांचे नूतनीकरण करून भाविकांना येथे देवदर्शनासोबतच सोयीसुविधाही देण्याचा मानस असल्याने सुमारे दीड कोटी रूपये अंदाजे खर्चाचे पाषाणाचे नवीन मंदिरासाठी बांधकाम करण्याचा संकल्प केल्यानुसार गेल्या ८–१५ दिवसांपासून बांधकामाला सुरूवात झाली आहे, अशी माहिती दिली. या बांधकामासाठी पाणी साठविण्याकामी मंदिराच्या डोंगरउताराला एक खड्डा खणण्यात आला असता नरसिंहमंदिर कंन्स्ट्रक्शन लातूर येथील बांधकाम व्यावसायिकांच्या कामगारांना या खड्ड्यातील मातीचा उपसा केलेल्या ढिगाऱ्यामध्ये काही पाषाणाच्या मुर्ती आढळून आल्याने कामगारांनी त्या वेचून मंदिरासमोरील प्रांगणात मांडल्या. यापार्श्वभूमीवर, पोलादपूर तालुक्यातील आठगांव कोंढवी भैरवनाथमंदिराचा पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्यासोबतच तीर्थक्षेत्र वा यात्रास्थळाचा दर्जा द्यावा, अशी मागणी केली आहे. या घटनेची माहिती कर्णोपकर्णी पोलादपूर तालुक्यात पोहोचली असता अनेक भाविकांनी या मुताअचे दर्शन घेण्यासाठी आठगांव कोंढवी भैरवनाथ मंदिराकडे धाव घेतली. सर्वत्र या मंदिर परिसरात आणखी अश्मयुगीत मुर्ती आढळून येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती पॅरा मोटरिंग कोणाच्या परवानगीने सुरू? नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

मागील आठवड्यापासून श्रीवर्धन समुद्रकिना–यावरती पॅरा मोटरिंग हा प्रकार सुरू करण्यात आला आहे. या अगोदर समुद्रकिनाऱ्यावरती विविध प्रकारचे वॉटर स्पोर्ट्स सुरू होते. तसेच पॅरा ग्लायडिंग देखील सुरू होते. परंतु श्रीवर्धन व दिवे–आगर समुद्रकिनारी पॅराग्लायडिंग करताना काही पर्यटकांना अपघात झाल्यानंतर पॅराग्लायडिंग बंद ठेवण्यात आले आहे.

पॅराग्लायडिंग करताना एका जीपच्या मागे दोरी बांधून पर्यटकाला पॅराशूट मध्ये अडकविण्यात करण्यात येते व जीप गाडी चालू झाल्यानंतर सदर पॅराशुट बलुन हवेमध्ये उडू लागते. परंतु सगळ्यात धोकादायक प्रकार हा पॅरा मोटरिंग आहे. पॅरा मोटरींगच्या मशीनला खाली हेलिकॉप्टर प्रमाणे दोन चाके आहेत तर मागे एक इंजिन लावलेले आहे. या इंजिन मधून सुटणाऱ्या हवेमुळे त्या पॅरा मोटरींगचा पॅराशुट बलून फुगला जातो व हेलिकॉप्टर प्रमाणे हे पॅरा मोटरिंग उडु लागते. सदर बलूनला केवळ काही दोऱ्या बांधलेल्या आहेत व त्यामध्ये पॅरा मोटरींग चालवणारा चालक व एका पर्यटकाला हेल्मेट घालून बसवण्यात येते. पॅरा मोटरिंग करताना फक्त समुद्रकिनाऱ्यावर उड्डाण न करता श्रीवर्धन समुद्र किनाऱ्याच्या आतील भागात त्याच प्रमाणे खोल समुद्रात देखील पॅरा मोटरिंग उडत असल्याचे पाहायला मिळते. सदर पॅरा मोटरिंग हा प्रकार अत्यंत धोकादायक असून यामध्ये अपघात झाल्यास कोणतीही घटना विपरीत घडल्यास जबाबदार कोण? असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

पर्यटकांना नवीन आकर्षण वाढवण्यासाठी हा प्रकार असला तरीही सदर पॅरा मोटरींग चालवणारा चालक हा कोणत्या ठिकाणी प्रशिक्षण घेतलेला आहे का? याबाबतही कोणतीही माहिती नाही.

पॅरा मोटरींग सुरू असताना सदर मोटरींगचे इंजिन बंद पडल्यास ते खाली येऊन जमिनीवर पडू शकते. अशा–वेळी मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरचे पॅरा मोटरींग सुरू करण्यामध्ये काही राजकीय व्यक्तींचा देखील हात असल्याचे बोलले जात आहे. तरी स्थानिक प्रशासनाने व पोलिसांनी सदर पॅरा मोटरिंग कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे व त्यांनी कोणत्या विभागाकडून परवानगी घेतलेली आहे याबाबत माहिती करून घ्यावी. अन्यथा सदर पॅरा मोटरींग प्रकार श्रीवर्धन समुद्र बंद करावा अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

गुन्हे शाखा कक्ष-२ पनवेलने केला १ लाख २९ हजारांचा गुटखा हस्तगत

दै.रायगड नगरी । नवेल

गुन्हे शाखा कक्ष–२ पनवेलने मोठा खांदा येथे टाकलेल्या छाप्यात १ लाख २९ हजारांचा गुटखा हस्तगत केला असून याप्रकरणी दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

महाराष्ट्रात गुटखा व सुगंधी तंबाखू विक्री व जवळ बाळगण्यास बंदी असतानाही मोठा खांदा येथील भगत चाळीमध्ये काही जणांनी बेकायदेशीररित्या गुटखा व सुगंधी तंबाखू जवळ ठेवल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष–२चे पोलिस हवालदार पाटील यांना मिळताच गुन्हे शाखा कक्ष–२चे वपोनि गिरीधर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक कराड, पोलिस हवालदार साळुंखे, पाटील, घाडगे, पोलिस नाईक कुदळे, पाटील, पोलिस शिपाई पाटील आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून आरोपी ललितकुमार हरिओम गुप्ता (वय–३२, रा.– तळोजा) व अंजुमन पानउल्ला शेख (वय–४५, रा.–कामोठे) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून जवळपास १ लाख २९ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करून त्यांच्याविरूद्ध भादंवि कलम ३२८, २७३, २७२, १८८ सह अन्नसुरक्षा मानदे कायदा कलम अन्वये कामोठे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

महामार्ग पोलिसांच्या वाकण मदत केंद्राची कौतुकास्पद कामगिरी ; वर्षभरात केला ७९ लाखांचा दंड वसूल

दै.रायगड नगरी । नागोठणे

मुंबई –गोवा महामार्गावरील अपघात कमी होण्याच्या दृष्टीकोनातून महामार्ग पोलीस मदत केंद्र वाकण यांच्याकडुन सन २०२० या वर्षात विविध उपक्रम राबविण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून सुमारे २५ हजार वाहन चालकांवर नियमांचे उल्लंघन करणा–या म्हणजेच वाहन चालवतांना शिट बेल्ट न लावले, वाहन चालविण्याचा परवाना नसणे, हेल्मेट नसणे, वाहनांचा अति वेग अशा प्रकारे वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडुन एकुण ७९ लाख एवढा दंड आकरण्यात आला आहे. या कौतुकास्पद कामगिरी बद्दल वाकण मदत केंद्रातील पोलिसांना वरिष्ठांकडून शाबासकीची थाप मिळाली आहे.

महाराष्ट्र राज्याचे वाहतूक विभागाचे अप्पर पोलीस महासंचालक भूषणकुमार उपाध्याय यांचे निर्देशानुसार महामार्ग पोलिसांच्या रायगड परिक्षेत्राचे पोलिस अधिक्षक संजय बारकुंड व महामार्ग पनवेल विभागाचे पोलिस निरिक्षक सुदाम पाचोरकर यांच्या मार्गदर्शनानुसार वाकण मदत केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक परशुराम भोईर व त्यांचे सहकारी यांनी महत्वपूर्ण कामगिरी बजा–वली आहे. कोरोना संसर्ग कालावधीत कोरोना विषाणूचा प्रतिबंध करण्याच्या कामातही त्यांनी अहोरात्र मेहनत घेऊन वाहन चालकांना मास्क, सॅनिटायझर यांचे वाटप तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने मार्गदर्शन केले आहे. अपघात घडल्यानंतर तात्काळ त्या ठिकाणी पोहचून अपघातग्रस्ताना मदत पोहचविणे तसेच महामार्गावर कोठेही वाह–तूक कोंडी होऊ नये म्हणून वाकण मदत केंद्राचे महामार्ग पोलीस सतर्क असतात. गेल्या वर्षीच्या तुलनेत महामार्गावरील अपघातांचे प्रमाण घटले आहे. यापुढेही अपघातांचे प्रमाण कमी करण्याचे आपले प्रथम कर्तव्य असून लोकांनी वाहतुकीचे नियम पाळून सहकार्य करावे असे आवाहन महामार्ग पोलीसांच्या वाकण मदत केंद्राचे पोलीस उप निरीक्षक परशुराम भोईर यांनी केले आहे.

पुलावरील सांधे ठरत आहेत जीवघेणे माणगाव-दिघी मार्गावरील अनके ठिकाणी कंत्राटदाराचे अर्धवट काम

दै.रायगड नगरी । शिस्ते

माणगाव – दिघी महामार्गावरील रस्त्यांमध्ये येणा–या पुलांवर असलेल्या रस्त्यांच्या पृष्ठभाग जरी चांगला असला मात्र पुलावरील जोड रस्त्यांमुळे वाहनांना दणके बसत आ–हेत. लहान वाहनांना या जोड सांध्याचा मोठा त्रास होत असतो परिणामी त्याचा मसानी व शारीरिक त्रास हा प्रवाशांना व वाहनचालकांना होत आहे. याकडे कंत्राटदाराचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. पर्यटक, छोटे– मोठे वाहनचालक, बाईकस्वार यांना संताप व्यक्त करत आहेत.

मोठ्या वाहनांना याचा फारसा त्रास झोत नसला तरी मोठ्या वाहनांचे दणके मात्र पुलाचे आयुष्मान कमी करणारे असतात. सर्वच पुलाच्या ठिकाणी महामार्गावर लांब वा छोटा पूल गाड्यांना इतका दणके देणारा असतो, की अचानक पुलावर कार जाताच वेग कमी करावा लागतो, तेथील सांधेजोड

अयोग्य पद्धतीने झालेली असल्याचे पाहता क्षणी जाणवते. तेथील डांबराचा भागही नीटपणे रस्ता म्हणून विचारात न घेता केलेला असल्याचे निदर्शनास आले आहे. पूल हा विशिष्ट पद्धतीने काही भागांमध्ये विभाजित करून तयार केलेला असतो. प्रत्येक भाग जोडलेला असतो त्या ठिकाणी रस्त्यावर आपल्याला सांधे असलेले दिसतात. काही पुलांवर ते दिसत नाहीत तेथे त्यावरच डांबरीकरणही केलेले दिसते. सांधे असलेल्या भागात रस्त्याचा भाग काहीसा खाली असल्याने वाहनाला तेथे धक्के बसत असतात. मोठ्या वाहनांना ते फार जाणवत नाहीत. तसेच एकंदर देखभालीचा प्रकार व रस्ते बनवतानाची दक्षता घेण्यामधील हेळसांड पाहिली तर या सांध्यावर दुचाकी, तीन चाकी, लहान आकाराच्या वा मध्यम आकाराच्या मोटारी नेताना धक्के जाणवतात.

आधीचा रस्ता चांगला असेल व नंतर पुलावर आल्यानंतर अचानकपणे येणा–या या सांध्याच्या रस्त्यावर आल्यानंतर खड्ड्यासारखा धक्का जाणवतो. त्यामुळे तो खड्डा जास्त त्रासदायी असेल तर वाहना चाल–वताना अतिवेग असेल तर कदाचित नियंत्रणावर परिणाम होऊ शकतो, परिणामी मोठं अपघात देखील होय शकतो. वाहनांचे स्स्पेंशन अशा प्रकारच्या रस्त्यामुळे ते सांधे उडवून लावण्याच्या प्रयत्नाने खराब होऊ लागले आहेत.

त्याचा परिणाम आता गाड्यांचे सस्पेंशन, शॉक ॲब्सॉर्बर्स, स्प्रिंग्ज यावर होऊ लागला आहे. . कारच्या दरवाज्यांवरही, बिजागीरावरही परिणाम होत असतो. त्यामुळे कंत्राटदाराने रस्त्यांचे काम तात्काळ करावे अशी मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

'महात्मा गांधी स्मृती निलय' बैठक मंत्रालयात संपन्न

दै.रायगड नगरी । अलिबाग

महात्मा गांधींच्या १५० व्या जयंतीच्या औचित्याने शिवाजीनगर, पुणे येथे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन खादी व ग्रामोद्योग विभागामार्फत उपलब्ध जागी 'महात्मा गांधी स्मृती निलय' या माहिती व वस्तू संग्रहालय स्थापन करण्यासाठी प्रस्ताव मंजूर आहे. त्यानुषंगाने ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी उद्योग राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु. आदिती तटकरे उपस्थित होत्या.

यावेळी राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु.आदिती तटकरे म्हणाल्या, महात्मा गांधीजींच्या जीवनप्रवास आधुनिक माध्यमातून सर्वांना पहाता येईल, त्यासाठी पुणेसारख्या महत्त्वाच्या शहरात स्थापन होणारे 'महात्मा गांधी स्मृती निलय' हे संग्रहालय येणाऱ्या पीढीला निश्चितच मार्गदर्शक व दिशादर्शक ठरेल. २०२१ हे वर्ष महात्मा गांधी जयंतीचे १५१ वे वर्ष असून या नियोजित संग्रहालयाच्या पुढील तांत्रिक बाबीं व निधी उपलब्धतेसाठी ग्रामविकास विभागामार्फत प्रस्ताव वित्त विभागास तातडीने सादर करण्याबाबतचे निर्देश ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले. या बैठकीत नियोजित प्रकल्पाचा निमेटेड आराखडा सादरीकरणाच्या माध्यमातून सादर करण्यात आला.

या बैठकीस ग्रामविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार, खादी व ग्रामोद्योगच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नीलिमा केरकेट्टा व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

अपंगावर मात करीत जपला भांडी बनवण्याचा धंदा, बंद पडलेल्या व्यवसायाला दिली उभारी

दै.रायगड नगरी । तळा

वयाच्या सहा वर्षांपासून आलेले अपंगत्वावर मात करीत गणेश(बाबा) रामचंद्र वडके यांनी दोन्ही पाय वाकडे,उंची कमी, बोलण्यास अडथळा असे असताना निरक्षर न रहाण्यासाठी प्राथमिक शिक्षण कसे तरी तिसरी चौथी पर्यंत पुरे करीत वडीलांच्या हाताशी तांबा पितळी भांडी बनवणे भांड्याला कल्हई, पत्रा, डबे, दिवे, बनवण्याची कला अंगीकारून वडीलांच्या पश्चात पुढे चालू ठेवला मात्र आधुनिक काळाच्या ओघात हा व्यवसाय बंद पडत गेला.

वाढती महागाई तांबा पितळ धातुचे वाढते दर मजूरी यामुळे अनेक प्रकारचे भांडी बनवण्याचे कारखाने बंद पडले काहि शहरात मात्र मागणी असल्याने व्यवसाय सुरूआहेत. तर महाड, रोहा–अष्टमी, नागोठणे,पेण या मोठ्या शहरांमध्ये देखील बंद पडल्याने इतर व्यवसाय पत्करला आहे तर कार्हीनी नोकरी

पत्करली आहे हे वास्तव आहे. शहरात गणपती बनवण्याचा व्यवसाय सुरू केला आहे. त्यामुळे भांडी कल्हई लावणे दुरापास्त झाले आहे. मात्र आता याच व्यवसायाला आयुर्वेदात तांबा पितळ आरोग्यासाठी किती महत्त्व आहे हे पुन्हा समजू लागल्याने काही जण घरात हि भांडी वापरू लागली आहेत तर लग्न कार्यात मुलीला आंदणात देण्यासाठी परात, तांब्या भांडे, समई, हंडा, कळशी अशी दिल्या शिवाय रुखवत पुर्ण होत नाही. हे समजून गणेश व हरिश्चंद्र नी जिध्द बाळगुन आत्मविश्वास अंपगाचा न्युनगंड न बाळगता तेवढ्याच हिंमतीने बंद पडलेल्या व्यवसायाला पुन्हा उभारी देण्याला सूरुवात केली आहे. साधी रहाणी गाव खेड्यातील शहरातील ओळख असल्याने आताच्या परिस्थितीत व्यवसाय सुरु केला आहे. त्यामुळे उदर निर्वाह आज त्याच व्यवसायावर सुरु आहे. पांरपारीक व्यवसाय भावी पिढीने तिलांजली दिल्याचे सर्वत्र पहायला मिळते पण यांनी मात्र हयात असे पर्यंत करणार असल्याचे दिसून येत असूनस द्या रोज कासार आळीत हातोडा वाजायला लागल्याने कासार आळी असल्याचे जाणवू लागले आहे. त्यामुळे गणेश उर्फ बाबा याच्याकडे कौतुकाने पाहीले जात आहे. यामधून सदृढ व्यक्ती हि मनानेअपंग आहे. अपंग हे अंपग नसून मात्र समाजात वेगवेगळ्या दृष्टीने पाहिजे जाते. हि मानसिकता बदलणे गरजेचे आहे तरच दिंव्याग(अंपग) व्यक्तीच्या पंखात बळ येईल असे वाटते.